# ईशान्य ओहायो मराठी मंडळ

# ज्योती

## २०१८



तिमिरातुनी तेजाकडे

वार्षिक अंक । नोव्हेंबर २०१८ । भारतीय सौर कार्तिक शके १९४०

# अध्यक्षीय

**ॐ गं गणपतये नमः ॥ श्री सिद्धिविनायक नमो नमः ॥**



नमस्कार ईशान्य ओहायो मराठी मंडळ परिवार.. !!

सर्वप्रथम, मला आणि माझ्या सहकार्यांना मंडळाच्या कार्यकारिणीवर काम करण्याची संधी दिल्याबद्दल मन:पूर्वक आभार !

बघता बघता वर्ष २०१८ समाप्तीला आले आहे ! उत्साही कार्यकारी समिती, कार्यकर्ते आणि तुमच्या सर्वांच्या प्रचंड सहयोगाने, २०१८ हे वर्ष विविध कार्यक्रमांनी बहरले.

कला, साहित्य व मनोरंजन ह्यांची कास धरून आपले सण क्लीव्हलँड मध्ये सार्वजनिकरीत्या सर्व मराठीजनांनां बरोबर साजरे करता यावे व पुढच्या पिढीला हा आपला मराठी वारसा सुपूर्द करावा ह्या उद्देशाने २०१८ च्या कार्यसमितीने काही ठोस ध्येय डोळ्यासमोर ठेवून पदभार स्वीकारला. तसेच मंडळाची सदस्य संख्या वाढवणे, सर्व वयोगटातील सदस्यांना भावतील असे कार्यक्रम आयोजित करणे, जास्तीत जास्त व विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करणे आणि विशेष म्हणजे नवीन पिढीला मराठी अस्तित्वाची विचारशैली मिळावी ही सर्व प्रमुख ध्येये समोर ठेवून कार्यसमिती वर्षभर एकजुटीने आणि जोमाने काम करत होती.

कार्यसमितीने वर्षभर अथक परिश्रम करून विविध कार्यक्रम आपल्या सर्वांसाठी यशस्वीपणे सादर केले.

**पहिली तिमाही** - मकरसंक्रांत, गुढीपाडवा,

**दुसरी तिमाही** - स्वरतरंग (गाण्यांचा कार्यक्रम), 'स्वामी विवेकानंद' व्याख्यान,

**तिसरी तिमाही** - उन्हाळी सहल, मराठी बालसंस्कार शिबीर, BMM STEAM प्रकल्प,

**चवथी तिमाही** - गणेशमूर्ती कार्यशाळा , गणेश उत्सव व 'इये मराठीचिये नगरी', दिवाळी आकाशकंदील कार्यशाळा, प्रतिभा स्पर्धा आणि दिवाळी कार्यक्रम.

'इये मराठीचिये नगरी' ह्या पारंपारिक सांस्कृतिक कार्यक्रमात ५० हुन अधिक कलावंतांनी सहभाग घेतला. तीन महिने एकनिष्ठ तालीम आणि मेहनत करून हा कार्यक्रम यशस्वी सादर केला. कार्यसमिती आणि मंडळाचे विविध कार्यकर्ते ह्यांनी २-३ महिने अतिशय परिश्रम घेतले. सर्व कलावंत, कार्यसमिती आणि कार्यकर्ते ह्यांनी अतिशय उल्लेखनीय कामगिरी बजावली. त्यांचे प्रत्येकाचे जेवढे आभार मानावेत तेवढे कमी आहे.

सातासमुद्रा पलीकडे आपल्या मायबोलीचे उत्सव/ सण आपण सर्वजण एकत्र येऊन ज्या उत्साहाने साजरे करतो हे उल्लेखनीयच आहे. आपण सर्वानी मंडळाच्या सर्व कार्यक्रमांना दिलेल्या भरघोस प्रतिसाद, प्रेम व सहकार्याबद्दल मनापासून कोटी -कोटी धन्यवाद!!

मी अत्यंत आनंदी, तृप्त, आणि ऋणी आहे की माझा आणि माझ्या कार्यसमितीचा ह्या जगन्नाथाच्या रथाला पुढे नेण्यास हातभार लागला !!

कुठल्याही स्वयंसेवी संस्थांचे कार्य हे सभासद, कार्यकर्ते, आणि पुरस्कर्ते ह्यांच्या सहभाग व श्रमातूनच पुढे जात असते. ईशान्य ओहिओ मराठी मंडळाला गेली अनेक वर्ष सर्व घटकांनी मंडळाच्या कार्यावर विश्वास ठेवून मनापासून पाठिंबा दिला व त्यामुळेच ४३ वर्षा पूर्वी पेरलेल्या त्या बीजाचे आज बहारदार वृक्षात रूपांतर झाले आहे.

मंडळाच्या प्रगतीचा आलेख असाच चढता राहावा यासाठी आजही आम्हाला आपले सर्वांचे विचार, सूचना आणि मार्गदर्शन ह्यांची गरज आहे. कृपया त्या सर्व सूचना *president@neomm.org* ह्या ई -मेल वर जरूर पाठवा.

आपण सर्व मराठी मंडळींनी आपल्या मंडळाला असेच सहकार्य करत राहावे आणि ईशान्य ओहायो मधील सर्व मराठीप्रेमींचे मन एकत्र गुंफून ठेवणारे हे व्यासपीठ निरंतर टिकून राहावे हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

आपला ऋणी आणि आभारी,

***शेखर गणोरे***

**अध्यक्ष - २०१८**

# २०१८ कार्यकारिणी



अध्यक्ष :- शेखर गणोरे
president@neomm.org



उपाध्यक्ष :- अनिरुद्ध देशपांडे
vp@neomm.org



सचिव :- दीपक भट
secretary@neomm.org



कोषाध्यक्ष :- उत्कर्ष हजरनीस
treasurer@neomm.org



ज्योती संपादक आणि वेबसाईट व्यवस्थापक :- आनंद मोरे
editor@neomm.org





सांस्कृतिक कार्यवाह :- राधिका माळगावकर
आणि विशाखा देशपांडे
culturalsecretary@neomm.org



कार्यक्रम व्यवस्थापक :- अश्विन माळगावकर



बाह्यसंपर्क व्यवस्था :- रितू चक्करवार



युवा / बाल कार्यक्रम व्यवस्थापक :- तन्मयी दीक्षित,
आनंद मोरे

अन्न व्यवस्थापक :- केतकी अलुरकर, पल्लवी चव्हाण





विश्वस्त / सल्लागार :- नीलम गुप्ते,
चंद्रशेखर खाडिलकर,
श्रीकांत लिमये.





बृ .म. म. प्रतिनिधी :- संदीप दीक्षित



मराठी शाळा :- निलेश कुलकर्णी



# ताडोबा - वाघांचे नंदनवन

गेल्या काही वर्षात जन्मलेल्या अनेक बछड्या मुळे आपल्या महाराष्ट्रातील ताडोबा मध्ये सध्या ८० तें ९० वाघ आहेत.

Sonam and her cub up close about 20-25 feet



ज्या मुळे ताडोबा हे जगभरातील wildlife enthusiast साठी आवडते पर्यटनस्थळ आहे. आमच्या गेल्या ताडोबाच्या सफरी मध्ये आम्ही फारच भाग्यवान ठरलो. त्या अगोदर बांदीपूर मध्ये एकदा वाघाचे निसटते Sighting झाले हॊते. पण

ताडोबाची सफारी धमाल होती. चार दिवसात आम्ही ७ सफारी घेतल्या आणि त्यात चक्क ६ वेळा sighting झाले. ते सुध्दा multiple times. वाघीण तिच्या बछड्यांसहित - सोनम आणि तिचे दोन बछडे आणि माया व तिचे २ बछडे.
२-३ वेळा upclose. सोनम आणि तिचे बछडेतर चक्क २०-२५ फुटावरुन आणि नंतर मस्त पाण्यात डुंबताना. एकदा

माया आणि तिचे बछडे Kill खाताना. त्यानांतर माया ते kill ओढून नेताना.

Sonam and her cub enjoying water in hot Vidharbha Summer



ती एक पर्वणीच होती. असे वाटू लागले कि ताडोबा मध्ये हे बहुधा नेहमीचे असावे. पण तर Guide ने गैरसमज दूर केला कि ताडोबा मध्ये बरेच वाघ असल्याने sighting होत असले तरी असे इतक्या वेळा आणि इतक्या जवळून फार फार कमी वेळा असते.


इतरही बरेच प्राणी पहायला मिळाले - Wild dogs, Wild boars, Eagles आणि इतरही बरेच. फक्त ताडोबाच्या habitat मधील leopard आणि अस्वल काही दिसले नाही. तरीही एकूण ती ‘Most Memorable and most fabulous vacation’ झाली.

**: - शैलेश आणि गार्गी आचरेकर**






Maya – Queen of Tadoba



Maya is known as ‘Queen of Tadoba’. It is for good reason. She is boldest tigress of India. Due to her bold and ‘Don’t care Attitude’ walk very close to tourist gypsies. As per our guide her mother – Tara (if I remember her name correct) was similar.



Maya’s cub with Fresh Kill



Maya – Kill drag करून नेताना. दुपारी पहिले तेव्हा तिने ते किल पार तलावाच्या पलीकडे नेवून ठेवले होते







## ॥ अर्घ्य ॥

तुज अर्घ्य अर्पण्यासाठी मन आज आतुरलेले
परि ओंजळीत माझ्या काही न राहिलेले ॥ १
भरभरून बहरुनिया सजवला वसंत ज्यांनी
त्या वेली तरुंवर आता ना पान राहिलेले ॥ २
शमविण्या तृषार्त धरती वर्षाव ज्यांनी केला
ते नभीचे मेघ उदार केव्हाच पांगलेले ॥ ३
प्रणयास येई भरती ज्या चंद्रचांदण्याने
त्या पूर्ण चंद्रास आता राहूने ग्रासलेले ॥ ४
अद्वितीय भव्य शिल्पे घडविली ज्या करांनी
ना ते हात, भव्य शिल्पे, अवशेष राहिलेले ॥ ५
उच्चारुनी मंत्र प्रभावी अभिषेक ज्यांस केला
त्या मूर्ति पवित्र झिजुनी ना रूप राहिलेले ॥ ६
तू कोण? प्रश्न करता घुमला प्रतिध्वनीने
गाभारा शांत रिकामा कोणी न राहिलेले ॥ ७
ओसंडून मीपण माझे ओंजळीतच विरले
ओंजळीसहित माझ्या मी मलाच अर्पिलेले ॥ ८

– **श्रीकांत लिमये**

# मराठी बालसंस्कार शिबीर



## पाककृती - पल्लवी चव्हाण

# बीटरुटचे कटलेट

**साहित्य -** बटाटे ४, फरसबी, गाजर २, हिरवा वाटाणा, बीट १, कॉर्न फ्लोअर ४ मोठे चमचे, ब्रेडक्रम्स, खसखस १ मोठा चमचा, हळद १ चमचा, लाल तिखट १ मोठा चमचा, धने जिरा पावडर १ चमचा, गरम मसाला १ लहान चमचा, आले लसुण वाटण १ चमचा, काजुचे तुकडे, मीठ चवीनुसार, तेल.

**कृती-** प्रथम बटाटे उकडुन ते सोलुन मॅश करुन घ्या. फरसबीचे तुकडे करुन, गाजर आणि वाटाणा हे सगळे अर्धवट उकडून घ्या. मॅश केलेल्या बटाट्यामध्ये वरील भाज्या मॅश करुन घाला. नंतर त्यात बीट किसुन घालणे. मग सर्व एकजीव करुन त्यात कॉर्न फ्लोअ, ब्रेडक्रम्स, खसखस काजुचे तुकडे, आल लसुण वाटण, हळद, लाल तिखट, धने जिरा पावडर, गरम मसाला आणि चवीनुसार मीठ घालणे नंतर आवडीप्रमाणे कटलेटला आकार देऊन ब्रेडक्रम्स मधे घोळवुन शॅलोफ्राय करणे.

पुदीना चटणी किंवा टोमॅटो सा ॅस बरोबर सर्व्ह करणे.



# गणेशमूर्ती कार्यशाळा



# विहीर

इनमिन हजार–बारशे उंबरठ्यांच आमचं गांव. त्याच्यात असं काय विशेष असणार! पूर्वापार चालत आलेली गावाच्या वस्तीची रचना. दहा–बारा आळ्या–गल्ल्या अन् दोन तीन रांगांची बाजाराची जागा. भाजीमंडई, कापडंचोपडं, पोरांच्या खेळाच्या वस्तु, घरोघरी लागणारे तवे, उलथणी अन् माठ, सगळं काही त्या शेदोनशे पावलांच्या पट्ट्यात. त्यातच एक भाऊ वैद्याचा त्याच्या आयुर्वेदिक औषधांसारखाच जुनाट दवाखाना. दवाखाना कसला, फालतू गप्पा मारण्याची जागा ती. नाही म्हणायला बबन म्हस्केनं हल्लीच सुरू केलेल केस कापण्याचं दुकान त्यातल्या त्यात नविन. आरश्यांमुळे लख्ख उठून दिसत असल तरी तेवढच रिकाम. बबन मात्र बऱ्याचदा भाऊच्या दुकानातल्या कोचावरून आपल्या दुकानाकडे लक्ष ठेऊन बसलेला दिसायचा. कोणी गिऱ्हाईक चुकून आपल्या दुकानाकडे फिरकताना दिसला तर पळतपळत स्वत:च्या दुकानाकडे जायचा. हो, गिऱ्हाईकाने विचार बदलायच्या आधी त्याला खुर्चीत बसवायला पाहिजे. बबनची काही चूक नाही त्यात. आमच्या गांवात कपडे निटनेटके घालायची वानवा तिथे हाका मारायला वेळच्यावेळी केस कापून घेण्याची कुणाला पडल्ये. अगदीच अस्ताव्यस्त रान झालं तर लोकांना बबनची आठवण येत असे.

पण अगदीच काही वाईट नाही आमच गांव. गांवात एक शाळा आहे, पोस्ट ऑफिस आहे, अधुनमधुन फिरत्या थेटराची गंमतजंमत आहे. दिवसातनं दोनदा सड्यावर एस्टी येते. येताना तालुक्याकडून परत आलेली माणसं आणि टपाल घेऊन येते. तीच बस संध्याकाळी परत फिरते आणि गावातली बाहेर जाणारी माणसं आणि टपाल घेऊन जाते. आमचा शाळामास्तर गरीब माणूस. त्याच्याच बिचाऱ्याच्या डोक्यावर पार्टटाईम पोस्टमास्तरकी टाकल्ये तालुक्यानं. मास्तरही लई हुषार. पोरांना काहीबाही अभ्यास लावून देऊन वर्तमानपत्र आणि लोकांनी लिहिलेली आणि लोकांना आलेली पत्र वाचण हा मास्तरांचा उद्योग. पाच वर्षांपूर्वी गावात वीज आली तेव्हा एकच हंगामा झाला होता. ग्रामपंचायतीच्या हॉपिसात पहिला दिवा लागला तेव्हा गावात एकदम उत्सवाचं वातावरण झालं होत. सगळ्यांनी साग्रसंगित पूजा–प्रसाद करून विजेच स्वागत केल होत. हळूहळू सगळ्यांच्या घरात वीज आली, नव्याच कौतुक ओसरल अन् लोक सरावले. शाळेला वीजेचा खांब लावून घ्यायला मास्तराच्या नाकी नऊ आले. 'रात्री शाळंत पायजे कशाला उजेड?' इथुनच बाजारभावाला सुरुवात झाली. खटपट करून मास्तरनी तो बसवून घेतलाच. शाळेशेजारीच त्याच घर. त्याला रात्री फुकटची सोय झाली.

गावात वीज आल्यापासून गावाच चित्र पुष्कळच बदलल हे मात्र खर. म्हणजे रस्त्याला हळूहळू दिवे आले. लोकांनी शेतावर आणि घरच्या विहिरीला पंप लावून घेतले. काहीजणांच्या घरात मान फिरवणारे पंखे वारा घालू लागले. फिरत्या थेटरा ऐवजी एक छोटसं थेटर आलं. पानाच्या टपरीवर कंदिला ऐवजी छोटी ट्यूबलाईट आली. बाबू परदेशीचं धोब्याचं दुकान होतं. त्याच्याकडे कोळशाच्या इस्त्री होती त्या जागी विजेवर चालणारी इस्त्री आली. मास्तरची पार्टटाईम पोस्टमास्तरची नोकरी संपली, एक पूर्णवेळाचा पोस्टमास्तर आला. पोस्टात हळू आवाजात कडकट्ट्ट करणार तारेचं मशीन आलं. गावात हाका मारायला महिना पाच महिन्यातन एखादी तार यायची. पण आता सोय झाली. सड्यावर बस थांबायची तिथे तीन रस्त्यावर उंच खांबावर लावलेला दिवा आला. रात्री अपरात्री बसमधून येणाऱ्यांना आणि वाटसरूंना दिव्याचा आधार झाला.

इतकं सगळ झालं पण गावातली माणसं बदलली नाहीत. पुढची पिढी नोकरी निमित्ताने गावाबाहेर पडली अन् शहराकडे वळली पण गावकऱ्यांचे स्वभाव अन् समजुती मात्र तशाच राहिल्या, विजेचे दिवे आल्यावर सुद्धा कोनाड्यात ठेवलेल्या चिमणी सारख्या किंवा आढ्याला टांगून ठेवलेल्या कंदिला सारख्या. समजुती तरी किती विविध प्रकारच्या! "मांजर आडवं गेल्यावर, किंवा तिघजण जर काही कामाच्या उद्देशाने जात असतील तर काम होणार नाही", असल्या अतिशय साध्या सरळ बाळबोध समजुतींपासून ते अगदी "गावच्या मंदिरातल्या हरेश्वरापुढचा नंदी दरवर्षी

तिळभर पुढे सरकतो आणि जेव्हा तो समोरच्या हरळीतलावातल्या पाण्याशी पोहोचेल, तेव्हा जगबुडी होणार" असल्या अतर्क्य समजुतींपर्यंत! माझा असल्या अंधश्रद्धांवर मुळीच विश्वास नव्हता. तो हरेश्वरापुढचा नंदी जर पुढे सरकायला लागला तर समोरच्या शिवाच्या पिंडीला तो अडेल, इतकी साधी गोष्ट कशी काय यांच्या लक्षात येत नाही! देश स्वतंत्र झाला काय किंवा वीज आली काय, जुन्या गोष्टी आणि जुन्या सवयी अन् समजुती जात नाहीत हेच खरं.

यांना तुम्ही समजुती म्हणा, दंतकथा म्हणा, नाहीतर अंधश्रद्धा म्हणा. आमच्या गावांत यांची अजिबात कमी नव्हती. पाणवठ्यावर, चावडीवर आणि पारावर चघळल्या जाणाऱ्या या गोष्टींचं ज्ञान मला झालं ते बबनच्या दुकानातल्या रिकामटेकड्या गप्पांमधून. लोकांचे केस कापताकापता त्याच्या कैची बरोबर त्याची जीभही जोरात चालत असे. दाढीला साबण लावून ब्रशने फेस करताना, "काय, परवाची तालुक्याची बातमी कळ्ळी की नाही रावसाहेब तुम्हाला?" अशा कुतुहल जागवणाऱ्या प्रश्नापासून सुरुवात करून राजकारणापासून, गावांत कुणाची ऊठबस हल्ली कुणाकडे जास्त असते, कुळकर्ण्याचा पोरगा यंदा मॅट्रिकला कितव्यांदा नापास झाला, रमाकांत मेस्त्रीच्या पोराच धंद्यात कसं लक्ष नाहीये, वाड्यात पोरांनी अलिकडे काय काय उचापती केल्या, अशा सगळ्या ताज्या घडामोडींच बातमीपत्र फुकटात ऐकवल जात असे. आलेला गिऱ्हाईकहि मग त्यात स्वत:चे दोन आणे भर घालीत असे. म्हणजे पुढच्यावेळी बबनकडून आणखी मसाला मिळण्याची खात्री.

इतर मित्रांबरोबर मलाही बबनच्या खऱ्या न वाटणाऱ्या पण गुंग करणाऱ्या गावगप्पा ऐकण्याची सवय लागली होती. खरं तर आम्ही सातवी–आठवीत असताना चित्रकलेच्या बाईंचं पी.टी.च्या सरांशी कस लफडं आहे, हे त्याच्याकडून ऐकल्यावर आम्ही सगळे निष्पाप बालक थक्क झालो होतो. गेल्या पौर्णिमेला भाऊ वैद्याने काशीरामच्या मुलाला झालेली बाहेरची बाधा कशी उतरवली ते सांगता सांगता "सड्यावरच्या पिंपळाखालून अमावस्येच्या रात्री तो गेलाच कशाला कडमडायला?" असा बिनतोड सवालही तो करीत असे. आता भाऊ वैद्याची वैद्यकी बेताचीच होती आणि त्यामुळे तो फावल्यावेळात असले उद्योग करीतही असेल, पण मुळात हे बबनला कळतं कसं हे आम्हाला काही कळत नसे. एखाद दिवशी रंगात आला की गावाजवळच्या हरळीतलावात आसरा कशा आहेत आणि त्या येणाऱ्याजाणाऱ्याला कशा भुलवतात, हे तो ठोकून देत असे. आमच्यापैकी कुणी त्यावर शंका घेतली तर हरेश्वराची शपथ घेऊन लहान असताना एका पौर्णिमेच्या रात्री तो स्वत:च कसा तलावाजवळून परतताना भारला गेला होता आणि कसा त्या तलावाकडे ओढला जात होता; नशिब ऐनवेळी काठावरच्या बाभळीचा काटा त्याला टोचला, नाहीतर तो तलावात कसा ओढला गेला असता, हे रसभरीत वर्णन तो ऐकवित असे. बाकी राजकारण, तालुका जिल्हा पातळी वरच्या नेतेमंडळींच्या आतल्या गोटातल्या बातम्या, शासनाची कुठली नविन स्कीम कशी भंपक आहे असल्या समाजप्रबोधनाच्या गोष्टी तर नेहेमीच्याच होत्या. नाही म्हणायला अधूनमधून त्याच्याच दुकानात, किंवा 'आई शप्पथ! या इथेच दुकानाच्या पायरीवर' दादू पैलवानाने गरीब बिचाऱ्या हवालदाराची गच्ची कशी अन् कां धरली होती, मग साहेबान दादूला ठाण्यावर कसा बोलावला आणि त्यानंतर पुन्हा दादूनं हवालदाराला कसा दम भरला अशा थोड्याशा वाढवून चढवून सांगितलेल्या गोष्टींची वर्णनं ही असत.

लहानपणच्या त्या गोष्टी. त्या तेवढ्या पुरत्याच. आम्ही मोठे झालो अन् आपापल्या कामानिमित्त पांगलो. बरेच सोबती शहराकडे वळले. मी मात्र इथे गावातच राहिलो. हळुहळु या सगळ्या समजुती आणि भाकडकथा, जुनी भांडी अन् पुस्तकं जशी माळ्यावर जातात तशा, विस्मृतीत गेल्या. काही गोष्टींच स्मरण आणि कुतुहल मात्र कायम राहिलं. एक म्हणजे भाऊ वैद्याच्या जुनाट कपाटातले अर्क आणि काढे आणि दुसरी म्हणजे गावा बाहेरची ती विहिर. अरे! तुम्हाला त्या विहिरीबद्दल सांगायचच राहिलं. गावातली काही ठिकाणं आणि वास्तु या अगदी पहिल्या पासून कायमच तिथे स्वयंभू असल्यासारख्या होत्या. जस ते हरेश्वराच मंदिर, त्याच्या जवळच असलेला तो हरळीतलाव, तशी ही गावाबाहेरची माळावरची विहिर. गावातल्या इतर विहिरींच्या मानाने मोठी. म्हणजे खूपच मोठी, प्रचंड म्हणावी इतकी मोठी. पण वापरात नसलेली, दुर्लक्षित आणि त्यामुळेच की काय लोकांची खरी खोटी, विचित्र मतं असलेली.

रोजचा राबता तर राहू दे, महिनोनमहिने तिकडे कधी कोणी फिरकताना दिसायच नाही. गावाच्या वेशी जवळ

एक पिंपळाचा पुरातन वृक्ष होता. बाहेरून येणारा रस्ता पिंपळापाशी एकदम वळून गावाकडे जात असे. वेशीवरचं मारुतीच देऊळ आणि तो अजस्र पिंपळ याच्या त्रिकोणात, साधारण मध्यावर ती विहिर होती. खूप पूर्वी, कधीकाळी गांवाबाहेर म्हणे त्यावेळच्या राजाच्या सैन्याचा तळ होता. तेव्हा कुणा सरदाराने गांवकऱ्यांना त्रास न होता पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, म्हणून मुद्दामच गांवाच्या वेशीबाहेर ती विहिर बांधून घेतली म्हणतात. पण ती कधी वापरात असल्याचं गावातल्या जुन्याजाणत्या थकलेल्या लोकांनी, त्यांच्या लहानपणीही कधी ऐकलं नव्हतं. रस्त्यानं जाता येता किंवा बस मधून जाताना दुर्लक्ष करण्याची एक जागा एवढच महत्त्व आता तिला राहिलं होत. मला मात्र माळावरच्या त्या ओसाड पडक्या विहिरी बद्दल नेहेमीच कुतुहल वाटत आल होत.

लहानपणी त्या विहिरीकडे जाण्याचा प्रश्नच नव्हता. नंतरही आम्ही मित्र संध्याकाळी फिरायला जात असू तरी कधी मुद्दाम तिकडे आमच जाणं होत नसे. आमच्या चकरा हरळीतलावकडेच जास्ती. अलिकडे तर सगळे मित्र आपापल्या उद्योगाला लागले. गावाबाहेर पडले. आपापल्या संसारात गढून गेले. पण मी रोज फिरायला जाणं सोडलं नाही. कुणी बरोबर असलं तर ठीकच नाहीतर एकटाच.

पूर्वी संध्याकाळी मारुतीच्या देवळातली आरती करून आम्ही मित्रमित्र फिरायला बाहेर पडत असू. मी काही मारुतीच्या आरतीला जाणाऱ्यातला नव्हे, पण सवयीनं आरती होई पर्यंत देवळासमोरच्या पारावर थांबलो आणि लोक आपापल्या घरी परतू लागल्यावर फिरायला निघालो. आज कशी कुणास ठाऊक पण माझ्या मनांत त्या विहिरीकडे चक्कर मारायची हुक्की आली. आज कुणी बरोबरही नव्हतं. चला तेहि बरच झालं. बरोबर कुणी असतं तर मला पाहिजे ते करायला मिळाल असतच असं नाही. मंदिरातून अजुनही काही रेंगाळलेले लोक बाहेर पडत होते. त्यामुळे मारुतीच्या मंदिरावरून जाणारी वाट टाळून मी थोडा आडवाटेने सड्यावर जायला निघालो. ऐन वेळी कुणीतरी रस्त्यात आला तर विहिरीकडे जाण्या ऐवजी भलतीकडेच जायची वेळ यायची.

सड्यावर आल्यावर रस्ता ओलांडून मी विहिरीच्या दिशेने चालू लागलो. थोड्यावेळाने रस्ता सोडून माळरानातल्या पायवाटांवरून मी जाऊ लागलो. रस्त्यावरून साधरणपणे दिसत असली तरी विहिर तशी रस्त्यापासून बरीच आत होती. संध्याकाळची कातरवेळ टळून आता अंधार होऊ लागला होता. मी जसा विहिरी जवळ येऊ लागलो तसे तिथले तपशील लक्षात येऊ लागले जे आतापर्यंत कधी माहिती नव्हते. फिकट अंधाराच्या पार्श्वभूमीवर विहिरी जवळच एक आंब्याच्या झाडाची गडद आकृति स्पष्ट होत गेली. भोवतालच्या अर्धवट अंधारलेल्या वातवरणामुळे दुसरा एखादा परत फिरला असता, पण मी इतका काही घाबरट नव्हतो. आणखी पुढे गेल्यावर विहिरीच्या भोवताली आणि आंब्याच्या झाडा भोवती चक्र कुरणांत असावी तशी हिरवळ आणि अधूनमधून उंच गवताची बेटं असल्याचं माझ्या लक्षात आलं. भोवतालच्या शुष्क आणि मुरमाड माळरानात मध्येच असा गवताळ भाग कसा? मला आश्चर्ययुक्त प्रश्न पडला. बहुतेक विहिरीच्या ओलाव्याने असेल. मी माझ्या मनाच समाधान केलं.

आतां विहिर अगदी जवळ आली होती. चंद्रहि बहुधा उगवला असावा. उगवला असला तरी पूर्वेला चंद्रापुढे विरळ ढग होते. त्या क्षीण चंद्रप्रकाशात विहिरीचा अष्टकोनी आकार, घडीव चिऱ्यांचा काठ आणि विहिरीलगतची बांधून काढलेली वर्तुळकार पाणलोटाची जागा, अस्पष्ट असा हातरहाट दिसत होत. ते चिरे अन् ती पाणलोटाची बांधणी दगड गोटे नि धुळीनी, मोडून पडलेल्या वेड्यावाकड्या लहानसहान फांद्या–काटक्यांनी आणि वाऱ्यावर उडालेल्या वाळलेल्या गवतानी अगदीच अस्ताव्यस्त अन् विरूप दिसत होती. मला त्याचं काहीच आश्चर्य वाटलं नाही. इतकी वर्ष कदाचित दशकं किंवा शतकं वापरात नसलेली विहिर अशीच असायची. अचानक चांदणं वाढलं होत. चंद्रावरचे ढग चंद्रावरून बाजूला सरकले असावेत. विहिराचा तो रहाट आता स्पष्ट दिसत होता. तोही मोडकळीस आलेला. कधीकाळी उत्तम सागवानाचा असावा पण आता अगदीच विरंगी, चरे पडलेला, सोलपटलेला आणि सांधे निखळलेला दिसत होता. मी थोडा निराश झालो. पण कुतुहल आणि उत्कंठा मला परत फिरू देत नव्हती. आता इथपर्यंत आलोच आहोत तर विहिरीत डोकावून तरी येऊ अशा विचाराने मी पुढे सरकलो. वाटेतले दगड अन् फांद्या चुकवून मी विहिरीच्या काठाशी आलो आणि धीर करून मी विहिरीत डोकावून पाहिलं.

धीर करून डोकावलो खरा आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. बाहेरून अगदी ओसाड पडीक दिसणाऱ्या विहिरीची आतली बाजू जणुकाही कोरी करकरीत नविन असावी अशी दिसत होती. वरच्या भागात सुबक चिऱ्यांनी घडवलेला काठ, खाली खोलवर गेलेला कातळ. विहिरीच्या आतल्या बाजूने चक्राकार उतरलेल्या चिंचोळ्या पायऱ्या. मधेमधे, बहुधा दिवा ठेवण्यासाठी, असलेले छोटे छोटेसे महिरपी कोनाडे. सगळकाही स्वच्छ चकचकीत. घाण आणि कचरा तर जाऊद्याच, ढेकळं नाहीत धूळही नाही. भिंतीवर आगंतुकपणे उगवणारी कसलीही रोपं नाहीत. विहिर आतल्या बाजूनी अगदी कालपरवा बांधून काढल्यासारखी नेटकी देखणी दिसत होती. रहाटावरून खाली आलेला दोरसुद्धा जाडजूड जुनेपणाची नामोनिशाणी नसलेला, सरळ खाली पाण्यापर्यंत गेला होता. मी खाली पाण्याकडे पाहिल. दोराला बांधलेल्या पोहोऱ्याचा पत्ता नव्हता पण ते पाणी, अतिशय स्वच्छ नितळ पाणी. गवताची काडी म्हणून नाही, शेवाळ्याचा मागमूस नाही की पाण्यावर फिरणारे निवळीचे किडे नाहीत. कुठे खळबळ नाही की पाण्यावर एखादी लहानशी लहर, छोटासा तरंगही नाही. पाणी इतकं स्वच्छ आणि शांत की नुसत्या चांदण्यामधे सुद्धा विहिरीचा तळ आरपार दिसत होता. एका बाजूला चांदण्यामुळे विहिरीच्या काठाची पाण्यावर पडलेली रेखीव सावली काळ्या चंद्रकोरीसारखी दिसत होती. चांदण्याने उजळलेल्या त्या पाण्याला जणुकाही त्या सावलीचं कोंदण लाभल होत. चंद्र आकाशात पुष्कळच वर चढला होता. रात्रीची शांतता, हवेतला थोडासा गारवा, आल्हाददायक चांदणं आणि त्या सावलीच्या कोंदणात उठून दिसणारं विहिरीच चकाकणार पाणी! मी स्वत:ला विसरून त्या पाण्याकडे पाहतच राहिलो. किती वेळ गेला कुणास ठाऊक. अचानक, मला त्या पाण्यात माझ्या चेहेऱ्याचं प्रतिबिंब पाहण्याची तीव्र इच्छा झाली. माझं प्रतिबिंब पहायला मी कठड्यावरून थोडा पुढे झुकलो देखिल पण चंद्राच्या चकाकणाऱ्या प्रतिबिंबामुळे मला माझा चेहेराच काय आकृतीही दिसत नव्हती. कुठल्या तरी अनाकलनीय ओढीन मला खाली पाण्याजवळ जाऊन प्रतिबिंब बघाव अस वाटायला लागल. विहिरीच्या कातळातून खोदलेल्या चिंचोळ्या पायऱ्या मला समोरच्या बाजूला रहाटा पलिकडे दिसत होत्या. तिकडे जाण्यासाठी मी वळलो, माझी दृष्टी पाण्यावरून बाजूला झाली अन् त्या क्षणी मी भानावर आलो. बापरे काय झाल काय मला? माझा माझ्यावरच विश्वास बसेना. रात्र तीच, विहिर तीच, चांदणं तसच मी मात्र आता भानवर आलो होतो. मला गमंत वाटली. चांदण्यात भटकणं हे काही मला नविन नव्हत. आमच्या कंपूचा हा तर एक आवडता उद्योग. फरक इतकाच होता की आज मी मात्र एकटाच आणि अनोळखी जागी होतो.

विहिरीपासून दूर जाण्यासाठी मी वळलो आणि विहिर आणि आंब्याजवळ असलेल्या हिरवळीवरून जवळच्या त्या आंब्याच्या झाडापाशी गेलो. कुणीतरी कधीतरी जांभ्याच्या दगडांनी बांधलेला नेटका पार, आता जीर्णत्वाच्या खुणा बाळगून होता. रात्र बरीच झाली होती. थोडावेळ इथे टेकाव अन् मग माघारी जाव अस मनाशी म्हणत मी त्या पारावर बसलो. आंब्याच डेरेदार झाड, निरव शांतता, भोवताली पसरलेलं पिठूर चांदण, हिरवळीवर पडलेली आंब्याची दाट छाया. मी मंत्रमुग्ध झाल्यासारखा तिथेच बसून राहिलो. किती वेळ गेला कुणास ठाऊक. त्या गूढ रम्य वातावरणात मला हलकेच झोप लागली असावी.

पैंजणांच्या नाजुक किणकिण माझ्या कानावर आली. मी डोळे किलकिले करून पाहिल. सगळ काही आधी जस होत तसच शांत स्तब्ध होत. मी दुर्लक्ष करून पुन्हा डोळे मिटले. जरा वेळानी पुन्हा तीच किणकिण. माझ्या लक्षात आल की मला हे बहुतेक स्वप्नात ऐकू येतय. पुन्हा तीच किणकिण आणि आता त्याबरोबर तितकाच नाजुक हसण्याचा आवाज! आता मात्र मी जागा झालो अन् डोळे पूर्ण उघडून आवाजाच्या दिशेने पाहिल. सुरुवातीला मला काहीच दिसल नाही. पुन्हा इथेच झोपाव की आता निघाव याचा विचार करताना पुन्हा पैंजणांचा आवाज आणि ते नाजुक आनंदी हसणं. आंब्याच्या खाली उतरलेल्या फांद्यांमधून मला आंब्या पलिकडच्या हिरवळीवर एक अस्पष्ट धूसर आकृती दिसली. माझ्या पेंगुळलेल्या डोळ्यांवरची झापड एकदम उडाली आणि ताठ बसून मी निरखून पाहू लागलो. चंद्र ढगांतून पुन्हा बाहेर आला असावा. चंद्राच्या डोळ्यांना थंड करणाऱ्या पिठूर चांदण्यात मला ती दिसली. दोन्ही हात उंचावून आकाशाकडे पहात स्वत:शीच हसत अस्फुट गुणगुणत ती स्वत: भोवती गिरक्या घेत होती. चांदणी रात्र, माळावरची निर्मनुष्य शांतता, पायांखाली मखमाली हिरवळ; नाचताना अन् गुणगुणताना सभोवतालच्या जगाला

विसरून ती जणु काही स्वत:मध्ये हरवून गेली होती.

आजपर्यंत मी असं अप्रतिम सौंदर्य कधी पाहिल नव्हत. तिचा सौष्ठवपूर्ण कमनीय बांधा, चांदण्यानं झिलई लावल्यासारखी, अधिकच उजळलेली अंगकांती, पूर्ण उमलेल्या फुलासारख उभारीला आलेल तारुण्य! मी आता स्वत:ला विसरून अनिमिष नेत्रांनी तिच्या सौंदर्याचा आविष्कार थक्क होऊन बघतच राहिलो. अचानक ती गिरक्या घ्यायची अन् गुणगुणायची थांबली. पाठमोरी असताना मान मागे वळवून तिने आंब्याच्या दिशेने पाहिल. मी एकदम चपापलो आणि सावरून बसलो. तिचे डोळे! एखाद्या शांत सरोवरावर कमळं फुलावित तसे तिच्या चेहेऱ्यावर उमललेले होते. माझ्याकडे नजर रोखून ती एकदम "कस पकडलं!" अशा आविर्भावाने खळखळून हसली आणि वळून आंब्याच्या दिशेने माझाकडे यायला लागली. अपरात्रीची वेळ, सुनसान माळरानावर समोर अनोळखी रूपवान स्त्री. माझ्या मनात तिथून ताबडतोब निघायला हव असा विचार आला. मी उठलो आणि एक पाऊल मागे घेतल सुद्धा. पण माझं मन मला तिथून हलू देत नव्हत. त्या आकर्षक सौंदर्यापुढे माझी मति गुंग झाली होती. तिची डौलदार चाल, कमरेच्या हेलकाव्या बरोबर किणकिणणाऱ्या मेखला, तालामध्ये नाजुकपणे रुणझुणणारा नुपुरांचा नाद, चालताना हळुवार हलणारी तिची जवळजवळ अदृष्य अशी ओढणी, आणि उजळलेल्या आरसपानी अंगकांतीला आणखीनच खुलवणारे लांबसडक मोकळे, हलकेच हेलावणारे केस! मी पुतळ्यासारखा स्तब्ध, तिच्याकडे एकटक बघत राहिलो.

ती माझ्याजवळ आली केव्हा ते मला कळलही नाही. "अरे, तू इथे आहेस हे मला माहितीच नव्हतं", ती म्हणाली. काय आवाज! "बर झाल दिसलास, नाहीतर मी आपली एकटीच भटकत बसले असते या चांदण्यामधे". एखाद्या लहानशा घंटेच्या नादाने भोवताल भारून जावा तसा तिचा स्वर मला भारून टाकत होता. मी तिथून निघण्याचा विचारही विसरून गेलो. "बस ना", ती स्वत: बसली आणि हाताला धरून तिनं मलाही पारावर बसवल. "न नाही, नको", मी आवंढा गिळून घोगऱ्या आवाजात कसबसं म्हणालो. ते ऐकून ती पुन्हा खळखळून हसली. "बस रे; अजून पुष्कळ वेळ आहे चंद्र मावळायला. चांदण्याचा आनंद तर घे!" तिचा स्वर, ते खव्याळ नादमधुर हसणं, रेखीव हनुवटी खाली असलेला मुलायम गळा, गुलाबाच्या पाकळ्यांसारखे ओठ. माझ्या हृदयाच पाणीपाणी झाल. संकोचून पारावर बसताना मी थोडा दूरच बसलो. "अरे एवढा काय लाजतोस, मी काही खाणार नाही तुला!", ती स्वत:हून जवळ सरकली आणि मला जवळजवळ बिलगून बसली. "थोडा वेळ गप्पा मारायला काय हरकत आहे तुला?", माझ्या डोळ्यांत निरखून पहात ती म्हणाली. तिच्या उत्फुल्ल काळ्याभोर डोळ्यांच्या गहिऱ्या रहस्यात मी कमळामध्ये भुंगा अडकावा तसा संपूर्ण सामावून गेलो. गोरेपान अनावृत्त खांदे, पाठीवर पसरलेला केशसंभार, पारदर्शक ओढणी खाली तोटक्या तलम तंग रेशमी कपड्यांत कसबस आवरून धरलेल यौवन आणि तिच्या अंगकांतीचा मादक सुगंध! तिच्या मोहिनीनी मंत्रमुग्ध झालेल्या मला जाणवत होतं ते फक्त तिचं शेजारी जवळ असणं आणि दिसत होते ते तिचे अथांग डोळे. नंतर किती वेळ आणि कायकाय आम्ही बोलत बसलो होतो त्याची मला जाणीवही राहिली नव्हती. तिनं माझ्या खांद्यावर डोक ठेवल कधी आणि माझा हात तिच्या लोण्यासारख्या मऊ हातात धरला कधी, ते मला समजलही नाही. ते लक्षात आलं ते जेव्हा ती एकदम सावरून बसली आणि माझ्या हातातला हात तिने सोडवून घेतला तेव्हा.

"काय झाल?", मी म्हटल. "चल, मला निघायला हव", ती म्हणाली. "एवढ्यात?" माझ्या सुरात नाराजी होती. त्याच माझ मलाच आश्चर्य वाटल. "हो रे. खूप वेळ झाला. तो बघ, चंद्र पश्चिमेला मावळतीला चाललाय. मी इतका वेळ चंद्राकडे पाहिलही नव्हत, इतका मी तिच्यात गुंगुन गेलो होतो. पाहिल तर पौर्णिमेचा चंद्र पश्चिमेकडे मावळायला निघाला होता. पण तिची मोहिनी अजुन उतली नव्हती. ती निघून जाणार, तिच्या मोकळ्या सहवासाचा आनंद मिळणार नाही, या विचाराने मी व्याकुळ झालो. "अग पण कोण तू? आज पर्यंत या गांवात कधी पाहिल नव्हत तुला. नांव तरी सांग तुझ", मी अजिजीनी विचारल. "अरे, मी या गावची नाही. काही दिवसांसाठीच आल्ये.", ती शांतपणे म्हणाली, "आणि नांवात काय आहे रे. समज तुझ्या आवडीच एखदं नांव". "नाही नाही, अस कस!", मी निराशेने म्हटल. "माझ नांव नीरा", ती म्हणाली. तिने नांव सांगितल्याच मला बर वाटल. "या गांवची नाहीस तर कुठली तू?", कुतुहलानी मी विचारल. "दूर तिकडे क्षितिजा पलिकडे आहे माझ गांव; चल, निघते मी", ती म्हणाली. दोन

पावल गेल्यावर पुन्हा मागे वळून मला म्हणाली, "इकडे आले की इथे जवळच राहते मी. तुला यायच असेल, तर चल माझ्या बरोबर. नाही तर असेच कधी तरी एखाद्या पौर्णिमेला भेटू पुन्हा". तिच ते मोहक रूप, नुसत्या एका दृष्टिक्षेपात सावजाला घायाळ करणारे ते डोळे, मला अगदी तिच्या बरोबर जायलाच हवं अशी तीव्र इच्छा झाली. माझ्यासाठी न थांबता ती पुढे निघाली होती अन् तिच्यामागे आठदहा पावलांवर, एखाद्या अदृष्य साखळीनी बांधल्यासारखा मीही जाऊ लागलो.

माझ्या पुढे हिरवळीवरून चालताना तिच्या पुष्ट शरीराची होणारी लयबद्ध मोहक हालचाल डोळ्यांत साठवून घेत मी तिच्या मागे चालत होतो. एकदम मला जाणवलं की ती गांवाच्या दिशेने जाण्या ऐवजी विहिरीकडे निघाली होती. "हे काय तिकडे कुठे चाललीस तू?", मी विचारतोय तो पर्यंत ती विहिरीशी पोचलीसुद्धा, आणि विहिरीच्या कठड्यावरच्या ओणव्या रहाटाखालून वाकून जाऊन विहिरीच्या अगदी कडेवर उभी राहिलेली मला दिसली. धावत विहिरीकडे जाताना मी ओरडलो, "अग! काय करत्येस तू!". मी विहिरीपाशी पोहोचे पर्यंत तिने रहाटाचा दोर स्वत:कडे ओढून घेतला होता. कठड्याशी पोचल्यावर मला ती दिसली. रहाटाच्या दोराला धरून एखाद्या पिसासारखी अलगद तरंगत विहिरीत उतरत होती. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसेना! पाण्याला स्पर्श होताच हळुहळू ती पाण्यात अदृश्य झाली. विहिर तशीच, पाणी तसच स्तब्ध शांत. एकही लहर नाही की तरंग नाही. तो रहाटाचा दोरही तसाच. जस काही, काही घडलच नव्हत.

मी खाडकन भानावर आलो. सगळं आकर्षण, सगळी मोहिनी एका क्षणात उतरली आणि मला दरदरून घाम फुटला. पौर्णिमेची रात्र, पौर्णिमेचा चंद्र. पौष पौर्णिमा. कर्कराशीतली पौर्णिमा, पुष्य नक्षत्रात चंद्र! जलराशीतली पौर्णिमा आणि मोहक आक्रमक चंद्र. माझ्या डोक्यात प्रकाश पडला. आसरा, जल अप्सरा! मला एकदम लहानपणी बबनच्या दुकानांत ऐकलेल्या अविश्वसनीय वाटणाऱ्या गांवगप्पा आठवल्या. मला माझ्याच हृदयाची धडधड जाणवत होती. बापरे! नशिब, मी वेळीच भानावर आलो अन् तिच्या बरोबर गेलो नाही! इथून, या विहिरीपासून, ताबडतोब दूर जायला हवं. मी पश्चिमेला आकाशाकडे पाहिल. आतापर्यंत बत्ताशासारखा धवलशुभ्र दिसणारा चंद्र आता तांबुस होऊन मावळतीला जवळजवळ टेकायला लागला होता. बावरून मी साहाजिकच पूर्व दिशेकडे पाहिल. उषेच्या आगमनाची तयारी सुरू झाली होती. आतापर्यंत गर्द काळंनिळं असलेल आकाश आता फिकट निळं होऊ लागल होत. अरे बापरे, आता लवकरच सूर्य उगवेल. माणसांची वर्दळ सुरू होईल. नेमकं मला कुणी इथे पाहिल म्हणजे नसती पंचाईत व्हायची. गांवात काय काय वावड्या अन् अफवा उठतील कुणास ठाऊक. मी झपाट्यान सडकेच्या दिशेने जाऊ लागलो. सूर्य उगवायच्या आत मलाही पिंपळाची सातवी फांदी गाठायची होती.

**– श्रीकांत लिमये**

# उन्हाळी सहल



# संक्रांत



# चित्रकला - रितिका चव्हाण





# आकाशकंदील  कार्यशाळा



# मंडळाची आर्थिक बाजू

| NEOMM Unaudited Statement of Accounts (01/01/2018 - 11/16/2018) | | |
|---|---|---|
| **Operating Fund** | | |
| **Opening Bank Balance as of 01/01/2018** | **$9,891.33** | |
| **List of items** | **Revenue** | **Expenses** |
| **Events 2017** | | |
| Makar Sankrant 2018 | $1,574.30 | $1,776.87 |
| Gudi Padwa 2018 | $0.00 | $494.35 |
| Hrishikesh Ranade Music Concert | $9,235.76 | $7,348.00 |
| Swami Vivekanand Talk | $1,170.00 | $1,068.24 |
| Ganpati 2018 | $6,769.42 | $3,728.00 |
| Kids Summer Camp | $245.97 | $231.00 |
| 2017 Expenses | $0.00 | $2,260.00 |
| Website Maintenance | $0.00 | $114.45 |
| Volunteer Badges | $0.00 | $21.33 |
| Membership 2018 | $320.00 | $0.00 |
| Interest Transfer from Trustee Account | $1,306.35 | $0.00 |
| **Balance as of 11/16/2018** | **$13,471.18** | |
| **Trust Fund (As of 11/09/2018)** | | |
| Balance before withdrawal of interest | $53,696.67 | |
| Interest | $1,306.35 | |
| Balance after withdrawal of interest | **$52,390.32** | |

**Marathi Mandal of Northeast Ohio (The Mandal) aka NEOMM**

**Unaudited** Preliminary Financial Statement of Advisory Board Account

Held with ThirdFederal Savings and Loans

**As of 11/09/2018**

| Account Type | Account Number | Date Opened | Maturity / Due Date | Balance Before Withdrawal of Interest | Rate of Interest | Interest Amount | Balance After Withdrawal of Interest |
|---|---|---|---|---|---|---|---|
| SV | 180012702 | 1/6/2003 | --- | $ 1,703.57 | 0.25 | $ - | $ 1,703.57 |
| CD | 180011735 | 2/16/2002 | 2/16/2022 | $ 9,472.55 | 1.887 | $ 284.88 | $ 9,187.67 |
| CD | 180011736 | 2/16/2002 | 2/16/2022 | $ 7,108.63 | 1.887 | $ 213.78 | $ 6,894.85 |
| CD | 203017921 | 8/4/2008 | 8/4/2023 | $ 6,710.68 | 2.82 | $ 29.94 | $ 6,680.74 |
| CD | 203029146 | 3/30/2017 | 9/30/2022 | $ 21,992.35 | 2.084 | $ 678.16 | $ 21,314.19 |
| CD | 259001358 | 9/3/1996 | 2/22/2023 | $ 6,708.89 | 2.477 | $ 99.59 | $ 6,609.30 |
| Total | | | | $ 53,696.67 | | $ 1,306.35 | $ 52,390.32 |

<u>**Note**</u>: An interest amount of **$1,306.35** was withdrawn from the accounts and a **check #1709709 dated 11/09/2018** for $1,306.35 was handed over to Mandal's Treasurer towards deposit to Mandal's Operating

# पतंग कार्यशाळा



# STEM Initiative



# गणपती मिरवणूक आणि गणेश वंदना






# स्वरतरंग


ईशान्य ओहायो मराठी मंडळ
· सुस्वागतम ·